**नि.दि.दावा क्र.१७१/२०२१**
(CNR : MHNS20018122021)
*देविदास शिरसाठ वि. विश्वनाथ गांगुर्डे*

## निशाणी क्र. ०५ खालील आदेश
*(पारीत दि.१७/०२/२०२२)*

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ३९, नियम १, २ प्रमाणे तुर्तातूर्त मनाई हुकूम होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

**२.** अर्ज व प्रकरणाचे अवलोकन केले. वादीतर्फे श्री. एस. डी. घुमरे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी ॲड. श्री. व्ही. सी. पगार यांचेमार्फत प्रकरणामध्ये दिनांक ०८/११/२०२१ रोजी हजर झाले. योग्य ती मुदत देवून सुध्दा प्रतिवादीने कैफियत दाखल न केल्याने दिनांक २३/१२/२०२१ रोजी निशाणी क. १ वर प्रतिवादीविरुध्द विनाकैफियत /जबाब असा आदेश पारित करण्यात आला. आज रोजी प्रतिवादी व त्याचे विधीज्ञ श्री. व्ही. सी. पगार यांना पुकारले असता ते गैरहजर.

**३.** वादीतर्फे युक्तिवाद करण्यात आला की, प्रस्तुतचा दावा कायम मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केलेला आहे. दावा मिळकतीवर वादीचे वडील व अन्य इसमांचा कब्जा होता. सहायक जिल्हाधिकारी भाग निफाड यांच्या आदेशान्वये सदरचा कब्जा नियमित करुन वादीच्या वडीलांचे नावे प्लॉट नं. ६ म्हणजेच दावामिळकत देण्यात आली. सदर आदेशाच्या अनुषंगाने दावामिळकतीवर फेरफार क्रमांक ५७६ सुध्दा घेण्यात आला. वादीचे वडील ०७/०४/१९८७ रोजी मयत झाल्यानंतर दावामिळकतीवर फेरफार क. १५०७ नुसार वादी व इतर वारसांची नोंद अभिलेखाला झालेली आहे. दावामिळकत वादीच्या मालकीहक्काने कब्जेवहिवाटीत आहे. प्रतिवादी त्याचा मिळकतीशी संबंध नसतांनाही वादीच्या दावामिळकतीवरील कब्जेवहिवाटीस हिल्ला हरकत करत असल्याने प्रतिवादीविरुध्द तूर्तातूर्त मनाई हुकूम देण्याची विनंती करण्यात आली.

४. वादीच्या विधीज्ञांमार्फत करण्यात आलेला युक्तीवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा कायम मनाई हूकूम होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. मौजे पंचाळे, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील गट नं. १४० मधील प्लॉट क्र. ६ क्षेत्र १.०० हे.आर ही दावामिळकत असून त्या अनुषंगाने निशाणी ३ सोबत दाखल केलेल्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता वादीचे नांव इतर वारसांसह दावामिळकतीला भोगवटदार सदरी नोंदवण्यात आलेले आहे. तसेच फेरफार क्रमांक ५७६ चे अवलोकन केले असता स. जिल्हाधिकारी भाग निफाड यांच्या आदेशानुसार अनुक्रमांक १० वर वादींचे वडील संपत भाऊ शिरसाठ यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते. तसेच फेरफार क्रमांक १५०७ चे अवलोकन केले असता संपत भाऊ शिरसाठ दिनांक ०४/०७/१९८७ रोजी मयत झाल्यानंतर वादीचे नांव वारस म्हणून दावामिळकतीच्या ७/१२ उता-यावर भोगवटदार सदरी लागलेले आहे. प्रतिवादीने जबाब दाखल करुन वाद उपस्थित न केल्याने वादीने प्रकरणामध्ये दाखल केलेल्या कागदपत्रांवर अविश्वास दाखवण्याचे कोणतेही कारण नाही. उपरोक्त विवेचनाच्या अनुषंगाने वादीचा दावामिळकतीवरील ताबा प्रथमदर्शनी प्रस्थापित झाल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

## -: **आदेश** :-

१. अर्ज (निशाणी क्र.०५) मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी अथवा तर्फे इसमांनी वादीच्या दावामिळकतीवरील कब्जेवहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत अगर अडथळा करु नये अशी तुर्तातूर्त मनाई दाव्याचा गुणदोषावर अंतिम निकाल होईपावेतो देण्यात येत आहे.

३. खर्चाबाबत आदेश अंतिम सुनावणीच्या वेळी करण्यात येतील.

DNYANESHWAR SHANKAR JADHAV
Digitally signed by DNYANESHWAR SHANKAR JADHAV
Date: 2022.02.17 16:30:45 +0530

( **डी. एस. जाधव** )
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
सिन्नर न्यायालय, सिन्नर

ठिकाण :- सिन्नर.
दिनांक :- १७/०२/२०२२.